IO

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District** (जिल्हा): ठाणे शहर **P.S.**(ठाणे): वर्तक नगर **Year** (वर्ष): 2022
**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0343 **Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 02/09/2022 02:58 बजे

2. **S.No.** (अ.क्र.) **Acts** (अधिनियम)

| S.No. | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):
1. **Day**(दिवस): दरम्यानी दिन
**Time Period** (कालावधी):
**Date From** (दिनांक पासून): 29/08/2022
**Date To** ( दिनांक पर्यंत): 01/09/2022
**Time From** (वेळेपासून): 13:00 बजे
**Time To** (वेळेपर्यंत): 17:30 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):
**Date** (दिनांक ): 01/09/2022 **Time** (वेळ): 23:30 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ
**Entry No.** (नोंद क्र.): 010 **Date & Time** (दिनांक आणि वेळ): 02/09/2022 02:42 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):
1. (a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर): दक्षिण, 4 किमी
**Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): उप नियोजक, उप प्रादेषिक कार्या,महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,ठाणेवर्ग 1

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):
**District(State)** (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):
(a) **Name** (नाव): नितीन मारुती वाघमोडे
(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव):
(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1989 (d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत
(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):
(f) **Passport No.**(पारपत्र क्र.): **Date of Issue** (दिल्याची तारीख):
**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):
(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):



Scanned by CamScanner

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | 402,मेराघर सोसायटी, निघू गाव, चैथा मजला, सी विंग,दहिसर वाकळण रोड,ठाणे,वर्तक नगर, ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | 402,मेराघर सोसायटी, निघू गाव, चैथा मजला, सी विंग,दहिसर वाकळण रोड,ठाणे,वर्तक नगर, ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-9821800414

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | शिवराज प्रकाश पवार | | | 1. बंगला नं 44, तलाठी कालनी,दिंडोशी रोड, नाशिक,वर्तक नगर,ठाणे शहर, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 24,000/रक्कमेच्या लाचेची मागणी करुन | 24,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 24,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

वर्तकनगर पोलीस स्टेशन गुन्हा र नं 343/2022 भ्रष्टाचार प्रतिबंधाक अधिनियम 1988, (सुधारणा 2018) चे कलम 7 मी नितीन मारुती वाघमोडे, वय 33वर्षे, व्यवसाय - रिक्षा चालक, रा. फलट नं. 402, सी विंग, चैथा मजला, मेराघर सोसायटी, निघू गाव, दहिसर वाकळण रोड, ता.ठाणे, जि.ठाणे फिर्याद लिहून देतो की, माझ्या परीचयाचे श्री.हाफीज अब्दुल बरी खान, रा.नगाव, ता.जि.ठाणे यांची नागाव येथे सव्र्हे नं. 228 येथे जमीन असून सदरची जमीन त्यांना विकसीत करायची आहे. त्याकरीता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, ठाणे यांच्याकडून झोन प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. श्री.हाफीज खान हे खाजगी कामात व्यस्त असल्याने त्यांनी सदरचे काम करण्याकरीता मला सांगून त्याबाबतचे अधिकार पत्र व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकरीता दयायचे पत्रामध्ये झोन प्रमाणपत्र माझ्याकडे देण्यासाठी माझ्या नावाचा उल्लेख करुन सदरचे पत्र स्वाक्षरी करुन माझ्याकडे दि. 08/08/2022 रोजी दिले होते. त्यानुसार मी सदरचे पत्र दि.29/08/2022 रोजी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, ठाणे कार्यालयात देवून तेथील अभियंता शिवराज पवार यांची भेट घेतली व सदरचे काम लवकरात लवकर करुन देण्याची विनंती केली. त्यावेळी शिवराज पवार यांनी काम त्वरीत करुन झोन प्रमाणपत्र देण्याकरीता रु 15,000/- रक्कमेची मागणी केली. तसेच माझे मित्र श्री.नागेश महाडीक यांनी दि 22/06/2022 रोजी श्री.रघुनाथ गोटीराम पाटील यांच्या दहिसर येथील सव्र्हे नं. 79 या जमिनीच्या झोन प्रमाणपत्राकरीता अर्ज केला असल्याचे सांगून सदर प्रमाणपत्राची श्री.शिवराज पवार यांना विचारणा केली असता त्यांनी प्रमाणपत्राकरीता रु 12,000/- रक्कमेची मागणी केली. सदर घटनेवरुन माझ्या लक्षात आले की, श्री.हाफीज अब्दुल बरी खान यांच्या सव्र्हे नं. 228 येथील जमीन विकसीत करण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, ठाणे येथून झोन प्रमाणपत्र देण्याकरीता रु 15,000/- व श्री.रघुनाथ गोटीराम पाटील, यांच्या सव्र्हे न. 79 या जमीनीचेझोन प्रमाणपत्र देण्याकरीता रु 12,000/- लाचेच्या रक्कमेची मागणी करीत असून मला त्यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी त्यांच्या विरुध्द कारवाई होण्याकरीता दि 29/08/2022 रोजी अन्टी करप्पन ब्युरो, ठाणे येथील पो.उप.अधी श्री.जाधव यांच्या कार्यालयात समक्ष हजर राहून तक्रार दिली होती.माझ्या तक्रारीची पडताळणी करण्याकरीता पो.उप.अधी श्री.जाधव यांनी ठाणे महानगरपालीका ठाणे या कार्यालयातून दोन शासकीय पंच साक्षीदारांना पाचारण केले. पंचाच्या उपस्थितीत सर्व कायदेशीर बाबींचा अवलंब करुन मला दि. 30/08/2021 रोजी लोकसेवक श्री. षिवराज पवार यांची भेट घेण्याकरीता डिजीटल व्हाईस रेकार्डर लावून पंच 1 श्री. चव्हाण यांच्या समवेत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, ठाणे कार्यालयात पाठविण्यात आले. मी, पंच 1 श्री.चव्हाण यांच्या समवेत लोकसेवक यांच्याकार्यालयात जावून लोकसेवक शिवराज पवार यांची भेट घेतली. कामाच्या अनुषंगाने त्यांच्याशी चर्चा केली. त्यावेळी लोकसेवक यांनी मला श्री.खान यांच्या नागाव येथील सव्र्हे नं. 228 च्या कामास एक दिवस लागेल असे सांगून श्री.पाटील यांच्या दहिसर



Scanned by CamScanner

येथील सव्हे नं. 79 प्रकरण घेवून जाण्यास सांगितले असता मी त्यांना होकार दर्शविला. त्यानुसार लोकसेवक यांनी मला श्री.नागेश यांनी सादर केलेल्या श्री.रघुनाथ पाटील यांच्या दहिसर येथील सव्हे नं 79 येथील जमीनीचेझोन प्रमाणपत्र माझ्या ताब्यात देण्याकरीता मुळ अर्जदाराच्या अधिकारपत्राची मागणी केली. मुळ अर्जदार श्री.पाटील यांच्या अर्जामध्ये झोन प्रमाणपत्र श्री.नागेष महाडीक यांच्याकडे देण्याबाबत नमुद करण्यात आले होते. परंतु श्री.नागेश हे गणपती सणाकरीता बाहेरगावी गेले असल्याने माझ्या नावाचे अधिकार पत्र गरजेचे असल्याचे लोकसेवक पवार यांनी मला सांगून हाताच्या इशा-याने रक्कमेबाबत विचारणा केली. त्यावर मी त्यांना किती रक्कम सांगितली अशी विचारणा केली असता त्यांनी रु. 12.000/-रक्कमेची माझ्याकडे मागणी केली. तसेच श्री.हाफीज खान यांच्या नागाव येथील सव्हे नं. 228 येथील जमिनीच्या झोन प्रमाणपत्राबाबत विचारणा केली असता सदर जमिनीचे झोन प्रमाणपत्र तयार झालेले नसल्याचे सांगून त्याकरीता देखील सारखीच रक्कम (रु 12.000/-) रक्कमेची मागणी केली. तसेच सव्हे नं. 79 च्या जमीनीचे तयार असलेले झोन प्रमाणपत्र ताब्यात देण्याकरीता शासकीयरक्कम भरण्याबाबत सांगून दहिसर येथील कामाचे प्रमाणपत्र व नकाशे दाखविले. त्यांनतर लोकसेवक पवार फक्त मलाच लिफ्टमध्ये घेवून गेले. लिफ्टमध्ये गेल्यानंतर लोकसेवक पवार यांनी पुन्हा माझ्याकडे रक्कमेची मागणी केली. सदरची रक्कम पार्टीकडून घेवून येणार असल्याचे सांगितल्यावर लोकसेवक पवार यांनी रक्कम दिल्यानंतरच प्रमाणपत्र देणार असल्याचे सांगितले. सदर रक्कमेमध्ये काही कमी करण्याबाबत लोकसेवक पवार यांना विनंती केली असता त्यांनी नकार दर्शविला व रक्कम घेवून येण्यास सांगितले.नमुद पडताळणीमध्ये लोकसेवक पवार यांनी श्री.रघुनाथ गोटीराम पाटील यांच्या सव्हे नं. 79 येथील जमीनीचे तयार झोन प्रमाणपत्र ताब्यात देण्याकरीता अधिकार पत्राची मागणी करुन प्रमाणपत्राच्या मोबदल्यात रु 12,000/- लाचेची मागणी केली. श्री.हफीज अब्दुल बरी खान यांच्या सव्हे नं. 228 येथील जमीन विकसीत करण्यासाठी झोन प्रमाणपत्र देण्याकरीता रु 12,000/- मागणी केली असे दोन प्रकरणांची एकुण रु 24,000/-इतक्या रक्कमेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. परंतु लोकसेवक यांनी मागणी केलेले श्री.रघुनाथ पाटील यांच्या सव्हे नं. 79 येथील जमिनीचे अधिकारपत्र वलाचेची रु 24.000/- इतकी रक्कममाझ्याकडे उपलब्ध नसल्याने सदरची सापळा कारवाई दिनांक 01/09/2022 रोजी करण्याचे ठरविण्यात आले. दि. 01/09/2022 रोजी लोकसेवक यांनी मागणी केल्याप्रमाणे लाचेची रक्कम रूपये 24,000/- उपलब्ध झाल्याने रक्कमेसह व श्री. रघुनाथ पाटील यांच्याकडील अधिकारपत्रासह मी अन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कार्यालयात हजर झालो. त्यानुसार सापळापूर्व कारवाई पूर्ण झाल्यानंतर लोकसेवक यांच्या विरूध्द लाचेचा सापळा आजमविण्याचा निर्णय घेण्यात आला. लोकसेवक पवार यांनी सांगितल्याप्रमाणे पंच 1 श्री.चव्हाण यांच्यासह मी डिजीटल व्हाईस रेकार्डर लावून अन्थ्रासीन पावडर लावलेल्या लाचेच्या रक्कमेसह (रूपये 24,000/-) लोकसेवक पवार यांची भेट घेण्याकरीता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कार्यालय, माजिवडा, ठाणेयेथे◌ जावून लोकसेवक पवार यांची भेट घेवून श्री. रघुनाथ पाटील यांच्या प्रकरणाकरीता अधिकारपत्र आणले असल्याचे सांगितले. तसेच श्री. हफीज खान यांच्या प्रकरणाबाबत विचारणा केली असता लोकसेवक पवार यांनी दोन्ही प्रकरणे तयार असल्याचे सांगून मला प्रत्येक प्रकरणाला आधारकार्डची प्रत जोडण्यास सांगितली.त्यानुसार दोन्ही प्रकरणाची प्रत्येकी एक हजार या प्रमाणे शासकीय फी ची रक्कम भरण्यास सांगितले. त्यांनतर पुन्हा लोकसेवक त्यांच्या कक्षात जावून त्यांनी माझ्या मोबाईल फोनवर काल करून प्रकरणाबाबत विचारणा केली व पुन्हा माझी भेट घेवून शासकीय फी भरण्यास सांगितले. त्यानंतर लोकसेवक पवार फक्त मला लिफटमध्ये घेवून गेले त्यामुळे पंच श्री.चव्हाण लिफटच्या बाहेर राहिले.त्यावेळी लोकसेवक यांनी चोविस आणले ना? असे विचारणा करुन लाचेच्या रक्कमेची मागणी केली. त्यावर मी त्यांना दोन्ही प्रकरणाचे चोविस हजार आणल्याचे सांगितल्यावरून त्यांनी चोविस हजार लाचेच्या रक्कमेची मागणी केली. त्यानुसार मी माझ्या पन्टच्या पुढील बाजूच्या उजव्या खिशातील अन्थ्रासीन पावडर लावलेली लाचेची रक्कम बारा हजाराचे दोन बंडल असे एकुण रूपये 24,000/- लोकसेवक पवार यांच्या समक्ष धरली असता त्यांनी सदरची रक्कम उजव्या हाताने स्विकारून ती डाव्या हातात घेवून त्यांनी परिधान केलेल्या पन्टच्या डाव्या खिशात ठेवून दिली. त्यानंतर मी व लोकसेवक पवार लिफटमधून बाहेर येवून कार्यालयात गेलो. त्यावेळी कार्यालयात हजर असलेल्या सापळा पथकास लोकसेवक यांनी लाचेची रक्कन स्विकारल्याबाबत पूर्व नियोजीत इशारा केल्यावरुन सापळा पथकाने लोकसेवक पवार यांना 15◌:40 वाजता रंगेहात पकडले. सदरची रक्कम त्यांच्या पन्टच्या डाव्या खिशामधून हस्तगत करण्यात आलेली आहे. सापळापुर्व कारवाई दरम्यान लिहिलेल्या नोंटाचे क्रमांक व हस्तगत लाच रक्कमेतील नोटांचे क्रमांक पडताळले असता ते जुळून आले. अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाशात केलेल्या तपासणीमध्ये लाचेच्या नोंटावर तसेच लोकसेवक पवार यांच्या दोन्ही हाताच्या तळहातावर व बोटावर अन्थ्रासीन पावडचे गुणधर्म आढळून आले.अशा प्रकारे लोकसेवक शिवराज प्रकाश पवार, वय 35वर्षे, उप नियोजक, उप प्रादेषिक कार्यालय,मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, ठाणे.(वर्ग 1) रा. परमेश्वरी पराडाईज, फ्लट नं. 502, ए विंग, दर्गाच्या मागे, माजिवडा ठाणे. मुळ रा. बंगला नं. 44, तलाठी कालनी, दिंडोशी रोड, नाशिक यांनी लोकसेवक या नात्याने त्यांना मिळालेल्या अधिकाराचा व पदाचा दुरूपयोग करून श्री. रघुनाथ पाटील यांच्याकडील अधिकार पत्र व त्यांच्या दहिसर येथील सव्हे नं. 79 या जमिनीच्याझोन प्रमाणपत्राच्या मोबदल्यातरूपये 12,000/- व श्री. हफिज खान यांच्या नागाव येथील सव्हे नं. 228 या जमिनीच्या झोन प्रमाणपत्राच्या मोबदल्यात रूपये 12,000/- असे एकुण रूपये 24,000/-रक्कमेच्या लाचेची मागणी करुन दि. 01/09/2022 रोजी 15.40 वा. उप प्रादेषिक कार्यालय, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, ठाणे येथे माझ्याकडून रूपये 24,000/- लाचेची रक्कम स्विकारली म्हणून लोकसेवक शिवराज प्रकाश पवार, उपनियोजकयांच्या विरूध्द माझी कायदेशीर फिर्याद आहे.

**13. Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): SADASHIV VISHNU NIKAM (I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

**No.**(क्र.):

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):



Scanned by CamScanner

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
वर्तकनगर पोलीस ठाणे

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): SADASHIV VISHNU NIKAM
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):

Scanned by CamScanner